# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** मेढा **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0177 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 23/10/2020 01:33 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 22/10/2020
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 22/10/2020
**Time From (वेळेपासून):** 14:10 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:10 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 23/10/2020 **Time (वेळ):** 00:10 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 001 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/10/2020 01:33 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 15 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** मुपो दुंद ताजावली, जि साता

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** संदिप एकनाथ दुंदळे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1981 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**



Scanned with CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मुपो दुंद ताजावली, जि साता,मेढा ,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मुपो दुंद ताजावली, जि साता,मेढा ,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9552303620

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सौ.लक्ष्मी सिताराम गोरे | | | 1. रा मेढा ताजावली, पद - सरपंच, ,मेढा , सातारा,महाराष्ट्र,भारत<br>2. रामेढा ताजावली, पद - सरपंच, ,मेढा , सातारा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दि23/10/2020 मी संदिप एकनाथ दुंदळे, वय 39 वर्षे शिक्षण-बी.कमव्यवसाय - बांधकाम व्यवसायीक मु.पो.दुंद ता.जावली,जि सातारा मो नं 955230362समक्ष मेढा पोलीस स्टेशन येथे हजर राहुन खबरी जबाब देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासमवेत राहणेस आहे. माझी स्वत:ची श्री.सहयाद्री कन्स्ट्रक्शन नावच्या कन्स्ट्रक्शन व्यवसाय आहे.मी सहयाद्री कन्स्ट्रक्शन या नावाने जावली तालुक्यामध्ये खाजगी व शासकिय कन्स्ट्रक्शनची बांधकामे करीत असतो.ग्रामपंचयात दुंद ताजावली यांनी मला सहयाद्री कन्ट्रक्शन या नावाने बांधकाम करणेकरीता ना हरकत दाखला दिला आहे. ग्रामंपचायत दुंद ता.जावली गावचे बंदीस्त गटर व कक्रींटचे बांधकाम मला ग्रामपंचायत दुंद बडीने मला रितसर तजवीजीने सप्टेंबर महिन्यात 1,80,000/-रुपयास दिले होते. ते बांधकाम मी सप्टेंबर 2020 मध्ये चालू करुन साधारण 5 ऑक्टोंबर 2020 रोजी पुर्ण केले आहे. केलेल्या कामाचा चेक कामाचे रक्कमेमधुन 12 जीएसटी कट करुन मला 80,400/-रुपये व 78,500/- रुपयाचे चेक श्री.कोळी ग्रामसेवक दुंद ता.जावली यांनी दि.13/10/2020 रोजी त्यांची स्वाक्षरी करुन देवुन त्यावर सौ.लक्ष्मी सिताराम गोरे रा.दुंद मुरा, सरपंच ग्रामपंचायत दुंद यांची सही घेऊन चेक वटवून घेण्याकरीता माझेकडे त्याच दिवशी दिले. सरपंच लक्ष्मी गोरे या सध्या मेढा येथे राहत असल्याने मी त्यांना त्यांचे मोबाईलवर फोन करुन त्यांना गटर व कक्रींट बांधकाम केलेबाबत मिळालेल्या बिलाचे चेकवर ग्रामसेवक यांनी सहया केल्या आहेत,आपली सही पाहिजे असे त्यांना सांगितले. त्याच वेळी सरंपच यांनी मला मी आता सातारला आहे. मला माझी टक्केवारी मिळाली तरच मी चेकवर सहया करते असे म्हणाल्या.त्यांना मी बांधकामाकरीता माझ्याजवळचे पैसे घातले आहेत, अजून चेक वटायचे आहेत तुम्हाला कसे काय पैसे देणार, असे म्हणालो. त्यावर त्यांनी मला तुम्ही डजस्ट करा मगच मी सहया करते असे सांगितले. तरीसुध्दा मी त्यांची चार पाच दिवस वाट पाहिली. त्यानंतर काल दि21/10/2020 रोजी सरपंच या दुंद येथे येणार असल्याचे समजल्याने मी त्यांची गाठ घेण्याकरीता थांबून राहिलो. दुपारी 1 ते 1.30 वा.चे सुमारास सरपंच लक्ष्मी गोरे या दुंद येथे आल्यावर मी त्यांची गाठ घेवून चेकवर सहया करण्यास विंनती केली. तेव्हा त्यांनी मला मी सांगितल्याप्रमाणे माझी टक्केवारी मिळाल्याशिवाय मी चेकवर सहया करणार नाही असे मला सांगितले. त्यावेळी मी, त्यांना किती होतील असे विचारले असता त्यांनी मला 5 ते 6 हजार होतील असे सांगुन माझ्याकडे पैशाची मागणी केली.मी केलेल्या कामाचे बिलाचे चेकवर सही करण्यासाठी दुंद या गावचे सरपंच लक्ष्मी गोरे यांनी माझ्याकडे मागणी केलेले 5 ते 6 हजार रुपये रक्कम मी त्यांना दिल्याशिवाय त्या चेकवर सही करणार नाहीत अशी माझी खात्री झाली. त्यामुळे मी नाईलाजास्तव लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा कार्यालयातील पोलीस निरीक्षक जगताप साहेब यांचेशी दि22/10/2020 रोजी संपर्क करुन माझी सरपंच दुंद ग्रामपंचायत ता.जावली यांचेविरुध्द लाच मागणीची तक्रार असल्याचे कळवुन त्यांची दि22/10/2020 रोजी मेढा येथे भेटण्यास जाणार असल्याचे कळविले. त्यावेळी श्री.जगताप यांनी मला दिनांक 22/10/2020 रोजी 12.00 वाजेपर्यंत मेढा गावच्या अलिकडे आमदार शशीकांत शिंदे कलेज जवळ रस्त्याचे कडेला येवुन



Scanned with CamScanner

थांबण्याच्या सुचना दिल्या पोनि जगताप यांनी दिले सुचनेनुसार मी दि.22/10/2020 रोजी 12.00 वाजण्याचे सुमारास मेढा गावच्या अलिकडे शिंदे कलेज जवळ रस्त्यावर दुचाकीसह येवून थांबून राहिलो. काही वेळातच पोनि. जगताप यांनी माझ्याशी संपर्क साधुन त्यांचेकडील वाहनाचे वर्णन सांगुन ते थांबले ठिकाणची माहिती सांगितली. त्याप्रमाणे मी त्याठिकाणी पोहचलो. त्याठिकाणी गेल्यानंतर पोनि. जगताप साहेब यांनी माझी ओळख करुन घेवुन घेतली. त्यावेळी पोनि. जगताप यांनी खाजगी वाहनामध्ये हजर असलेल्या मा.सहायक कामगार आयुक्त कार्यालय सातारा या कार्यालयातील श्री.राजेंद्र वसंत दळवी लिपीक व मा.जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, सातारा जिल्हा परिषद सातारा या कार्यालयातील श्रीमती उषा अरुण दाभाडे, लिपीक, या दोन शासकिय पंचांसह सापळा पथकाची एकमेकांस ओळख करुन दिली.त्यानंतर पोनि. जगताप साहेब यांचे सुचनेनुसार मी दोन्ही पंचांना माझी तक्रार कथन करुन माझा तक्रारी अर्ज व ग्रामसेवक, ग्रामपंचायत दुंद ता.जावली यांनी दिलेल्या दोन चेकच्या झेरक्स पोनि.जगताप यांचेकडे दिले.तसेच माझ्याकडील मुळचे दोन्ही चेक पोनि. जगताप व दोन्ही पंचानी पाहून त्याची खात्री केली. त्यानंतर माझ्या तक्रारी अर्जाचे व सोबतच्या सहपत्राचे पोनि. जगताप साहेब व दोन्ही पचांनी वाचन करुन माझ्या तक्रारीप्रमाणे दुंद ता.जावली गावच्या सरपंच लक्ष्मी गोरे, मडम यांनी माझ्याकडे लाच मागणी केली अगर कसे याची पडताळणी करण्यासाठी पंच नं.1 म्हणुन श्री. दळवी व पंच नं.2 म्हणुन श्रीमती दाभाडे यांनी काम करण्याचे जगताप साहेबांनी ठरवुन त्यावर सहया केल्या.त्यानंतर माझ्या तक्रारीप्रमाणे दुंद ता.जावली गावच्या सरपंच लक्ष्मी गोरे, मडम यांनी माझ्याकडे लाच मागणी केली अगर कसे याची पडताळणी करण्यासाठी मला व पंच नं.1 यांना सुचना देवुन व्हाईस रेकर्डरसह माझ्याकडील दुचाकी वाहनाने पंच नं.1 यांचेसोबत मेढा येथील गणेश सुपर मार्केट येथे सरपंच लक्ष्मी गोरे यांची भेट घेण्यासाठी पाठवुन पडताळणी केली असता त्यामध्ये सरपंच लक्ष्मी गोरे व माझी समक्ष भेट झाली.त्यावेळी आमचेमध्ये माझ्या कामासंबंधाने चर्चा झाली त्यावेळी सरपंच लक्ष्मी गोरे यांनी मला तुमच्या हिशेबान बघा फुल ना फुलाची पाकळी तरी दयावी लागते असे म्हणुन माझ्याकडे लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम लागलीच स्विकारण्याची तयारी दर्शविली असल्याची ध्वनिमुद्रीत झालेल्या संभाषणावरुन व माझ्या तसेच पंच नं1 यांचे हकिकतीवरुन पोनि जगताप व पंचांची खात्री झाली.त्यानंतर जगताप साहेब यांनी लाच रक्कम हजर करण्यास सांगितली असता त्यावेळी मी, माझ्याकडे 5000/- रुपये उपलब्ध असल्याचे सांगुन मी 5,000/-रुपये हजर केले. त्या नोटांचे क्रमांक एका कोऱ्या कागदावर लिहुन ठेवुन त्या लाच रकमेस अंथ्रासिन पावडर लावणे बाबतची कारवाई खाजगी वाहनामध्ये केली. सापळा कारवाईसंबंधाने जगताप साहेब यांनी मला व दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकास आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. त्यानंतर माझ्याकडे व्हाईस रेकर्डर देवुन पंच नं.1 यांना माझ्या सोबत दुचाकी वाहनाने सरपंच लक्ष्मी गोरे यांची मेढा येथील गणेश सुपर मार्केट या ठिकाणी भेट घेण्याकामी दुपारी 2 वा.चे सुमारास रवाना केले. त्यावेळी जगताप साहेब व सापळा पथक खाजगी वाहनाने आमचे पाठोपाठ काही अंतर ठेवुन आले.मी व पंच नं 1 श्री दळवी असे पोनि.जगताप सुचनेप्रमाणे मी माझ्या दुचाकी वाहनावरुन दुदं गावचे महिला सरपंच गोरे यांचे भाजीपाल्याचे स्टल समोर गेलो. त्याठिकाणी मी माझ्याकडील वाहन रस्त्याचे बाजुला पार्क केले. त्यावेळी सरपंच श्रीमती गोरे हया त्याचे स्टलमध्ये खुर्चीवर बसल्या होत्या. त्यानंतर मी व तक्रारदार असे सरपंच गोरे यांचे जवळ गेलो. त्यावेळी मी सरपंच गोरे यांना पैशे ठेवा पाच हजार रूपये हायत मोजुन घ्या हे असे म्हणालो त्यावर सरपंच श्रीमती गोरे यांनी  नाय नाय ते तुमच्या हयान दया नाहीतर परत माझ्या माग काय लफडयाच काम नकोत मला बाबा असे म्हणाल्या. त्यावर मी नाय नाय हे पाच हायत मोजुन घ्या बाकीचे काय असतील ना ते नंतर देतो असे म्हणालो. त्यावर सरपंच श्रीमती गोरे यांनी मी ठेवती हिथ पैशे असे म्हणुन उजवा हात पुढे केला लाच मागणी केली त्यावेळी मी माझ्या शर्टच्या डावे बाजुचे खिशामधुन लाच रक्कम उजव्या हाताने काढुन सरपंच श्रीमती गोरे यांचे समोर धरून मोजुन घ्या तेवढ असे म्हणालो.त्यावेळी सरपंच श्रीमती गोरे यांनी ती लाच रक्कम उजव्या हाताने स्विकारुन दोन्ही हाताने मोजुन त्याच्या समोरील कऊटरवर ठेवत हायत असे म्हणाल्या त्यानंतर मी माझ्या पंटचे डाव्या खिशातुन दोन चेक डाव्या हाताने काढुन श्रीमती गोरे यांना देऊन दोन चेक हयायती असे म्हणालो त्यावर श्रीमती गोरे दोन चेक हायत ना असे म्हणुन त्या चेकवर सहया करून परत माझ्याकडे दिले. त्यानंतर मी ते दोन्ही चेक उजव्या हाताने स्विकारून माझ्या शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवतएकाच बीलाचे दोन चेक हायत हे अठ्याहत्तर पाचशे आणि ऐंशी हजार असे मिळुन एक लाख अठ्ठावन्न हजार सीएसटी कटहुन असे म्हणालो. त्यावर श्रीमती गोरे या म्हणजे दोन्ही पण हया कामाचच झाल असे म्हणाल्या त्यावर मी एकाच कामाचेत असे म्हणालो त्यावर श्रीमती गोरे तेच ना ठिकय ना मग हया कामाच तुमच तर झाल असे म्हणाल्या. त्यावर मीआता हया कामाच पैशे तुम्हाला झाले बाकी काय असेल ते नंतर देतो असे म्हणालो. त्यावर श्रीमती गोरे या राहु दे मग चालतय असे म्हणाल्या. त्यानंतर मी लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्व नियोजित इशारा करण्यासाठी थोडे बाजुला येवुन दुपारी 2.10 वाचेसुमारास माझा डावा हात डोक्यावरुन दोन वेळा फिरवून लाच रक्कम स्विकारलेचा पुर्वनियोजित इशारा केला. तो इशारा पाहून पोनि.जगताप पंच नं 2 व सापळा पथक असे सर्वजण माझ्या जवळ आले. श्री जगताप साहेबनी माझ्याकडील व्हाईस रेकर्डर काढून घेवून तो बंद केला व मला बाजुला थांबण्यास सांगुन जगताप साहेब दोन्ही पंच व सापळा पथक असे सरपंच लक्ष्मी गोरे यांचे जवळ जावुन त्यांना ताब्यात घेतले त्यानंतर ते सर्वजण सरपंच लक्ष्मी गोरे यांना घेवुन खाजगी वाहनामध्ये गेले. त्याठिकाणी वाहनामध्ये काळ्या कपडयाचे सहाय्याने पोनि.जगताप व पथकाने सरपंच लक्ष्मी गोरे यांची तपासणी केली.त्यांनतर थोडयावेळाने जगताप साहेब यांनी मला खाजगी वाहनामध्ये बोलावुन घेतले त्यावेळी जगताप साहेब यांचेकडून मला समजले की सरपंच लक्ष्मी गोरे यांची पथकातील महीला पोलीस नाईक माने व महिला पंच श्रीमती दाभाडे यांनी तपासणी केली त्यावेळी त्यांचे दोन्ही हाताचे बोटांचे पेऱ्यास व तळहातास अंथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसुन आल्याचे सांगितले. त्यानंतर माझी देखील खाजगी वाहनामध्ये काळ्या कपडयाच्या सहाय्याने कृत्रीम अंधार करुन अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता माझ्या उजव्या हाताचे बोटांचे पेऱ्यास व तळहातास तसेच माझ्या शर्टचे पुढील डाव्या बाजुचे खिशाचे आतील बाजुस व कडांस अंथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली.त्यानंतर कारवाई दरम्यान सरपंच लक्ष्मी गोरे यांनी माझ्याकडील दोन चेकवर सही केली असल्याचे पोनि जगताप व दोन्ही पंचांना दाखवुन त्यांची खात्री करुन दिली.त्यानंतर मला खाजगी वाहनातुन बाहेर थांबण्यास सांगितले.त्यानंतर सरपंच लक्ष्मी गोरे यांना ताब्यात घेवुन जगताप साहेब व दोन्ही पंच तसेच सापळा पथक असे खाजगी वाहनांनी व मी माझ्याकडील दुचाकी वाहनाने मेढा येथुन निघुन एसीबी कार्यालय सातारा येथे आलो. त्या ठिकाणी श्री.जगताप साहेबांनी मला कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगुन सर्वजण एसीबी कार्यालयामध्ये गेले.त्यानंतर मला कार्यालयात बोलावुन घेवुन दोन्ही पंचांसमक्ष माझी अंगझडती घेतली. त्यानंतर जगताप साहेबांनी माझे व पंच नं 1 दळवी यांचे सांगणेप्रमाणे संभाषणाचे स्क्रिप्ट मधील नामोल्लेख केला. त्यानंतर मला पुन्हा कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर काही वेळाने पुन्हा मला कार्यालयात बोलावुन घेवुन मला हकिकत विचारली. त्यावेळी मी घडलेली हकीकत सांगितली. सदरबाबत सविस्तर यशस्वी पंचनामा एसीबी कार्यालय सातारा येथे टकलिखीत करुन पुर्ण करण्यात आला आहे.एकंदरीत मी दि22/10/2020 रोजीची दिलेल्या तक्रारीच्याअनुषंगाने दि. 22/10/2020 रोजी पंचासमक्ष करण्यात आलेली लाचेची पडताळणी आणि त्यानंतर केलेली सापळा कारवाई या दरम्यान घडलेल्या घटना तसेच ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण यावरुन लोकसेविका सौ लक्ष्मी सिताराम गोरे सरपंच ग्रामपंचायत दुंद ता.जावली यांनी माझ्याकडे दुंद गावामध्ये केलेल्या बंदीस्त गटर व काँक्रीट बांधकामाचे बिलाचे चेकवर सही करण्याकरीता टक्केवारी म्हणून 5000/- रुपयाची लाच मागणी ती लाच रक्कम सापळा कारवाईवेळी दुपारी 02.10 वाजणेचे सुमारास मेढा येथील गणेश सुपर मार्केट येथे त्यांचे भाजीपाला स्टलवर स्विकारली आहे म्हणुन माझी तक्रार आहे.



Scanned with CamScanner

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Nilkhanth Manik Rathod(I (Inspector)) / PCMH72348 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15.Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

Jadhav, M. B.
PN 1470

पोलीस स्टेशन ऑफिसर
पेठ पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाव):** Nilkhanth Manik Rathod
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PCMH72348



Scanned with CamScanner